श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## : विषय:

अग्नि सुरक्षा यंत्रणा (फायर एक्स्टिंग्विशर) व फायर बकेट भाडेतत्वावर मागविण्यासाठी तसेच आपातकालीन परिस्थितीत सदर फायर यंत्रणा हाताळण्यासाठी फायर मार्शलची नेमणूक करण्याकरीता मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

---

दि. २९ सप्टेंबर, २०२६ रोजी येणाऱ्या अंगारक संकष्ट चतुर्थीच्या दिवशी भाविकांच्या रांग व्यवस्थापनेसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपामध्ये अग्नि सुरक्षा यंत्रणा (फायर एक्स्टिंग्विशर) व फायर बकेट भाडेतत्वावर मागविण्यासाठी तसेच आपातकालीन परिस्थितीत सदर फायर यंत्रणा हाताळण्यासाठी फायर मार्शलची नेमणूक करण्याकरीता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

---

| | |
|---|---|
| दरपत्रक सूचना प्रसिध्दीचा वार व दिनांक | – मंगळवार दि. १५ सप्टेंबर, २०२६ |
| दरपत्रके स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – शनिवार दि. १९ सप्टेंबर, २०२६ सायंकाळी ५ वा. पर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | – सोमवार दि. २१ सप्टेंबर, २०२६ दुपारी १.०० वाजता |
| स्थळ | – श्रीसिध्दिविनायक मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

१. दि. २९ सप्टेंबर, २०२६ रोजी येणाऱ्या अंगारक संकष्ट चतूर्थीच्या दिवशी न्यासातर्फे भाविकांच्या रांग व्यवस्थापनेसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपामध्ये अग्नि सुरक्षा यंत्रणा (फायर एक्स्टिंग्विशर) व फायर बकेट भाडेतत्वावर मागविण्यासाठी तसेच आपातकालीन परिस्थितीत सदर फायर यंत्रणा हाताळण्यासाठी फायर मार्शलची नेमणूक करण्याकरीता मोहोरबंद दरपत्रक लिफाफे मागविण्यात येत आहेत.

२. उक्त कामासाठी तांत्रिक कागदपत्रे (Technical Document) व मूल्य दर (BOQ) असे दोन लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकारांनी तांत्रिक कागदपत्रे लिफाफा व मूल्य दर लिफाफा असे दोन वेगवेगळे लिफाफे सादर करावयाचे आहे.

३. ए ४ आकाराचे दोन वेगवेगळे लिफाफे लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मूल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रकधारक हा हिंदू असावा.

५. तांत्रिक कागदपत्रांच्या लिफाफ्यामध्ये पान क्र ९ नुसार सर्व कागदपत्रे जोडणे बंधनकारक असेल.

६. ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय खरेदी उप समितीने घेतल्यास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७. दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेऊन येणे.

८. दरपत्रकधारकारांनी सर्व BOQ मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. लेबर मजूरी व वाहतूक खर्च) मूल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी. सदर रक्कम GST वगळून (Excluding GST) असावी.

९. दरपत्रकधारकाची फर्म/कंपनी किमान ३ वर्षापूर्वीची असणे आवश्यक आहे.

१०. दरपत्रकधारकाकडे देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकीत कंपन्या, शासकीय, निम शासकीय, महानगर पालिका, संस्था तसेच अन्य ठिकाणी दरपत्रकात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम केल्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असावा.

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

११. अनुभवाकरीता प्रतिवर्षातील कमीत कमी एक कामाचे प्रमाणपत्र/दाखला, कार्यादेशाची किंवा देयकाची प्रत तांत्रिक लिफाफ्या मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.

१२. सदर कामासाठी वापरण्यात येणारी सुरक्षा यंत्रणा (फायर एक्स्टिंग्वीशर) BOQ मध्ये नमूद केल्यानुसार असावी. तसेच सर्व सुरक्षा यंत्रणेवर कालबाह्यता दिनांक असणे आवश्यक आहे.

१३. नेमणूक करण्यात येणारे फायर मार्शल हे प्रशिक्षीत असावे. कंत्राटदाराने काम सुरू केल्यानंतर सर्व फायर मार्शलना सुरक्षिततेचे नियम पाळणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

१४. काम सुरू करण्यापुर्वी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या सर्व नियम व सूचनांचे पालन करणे (उदा. या कामासाठी लागणारे विविध परवाने व सुरक्षिततेचे नियम) कंत्राटदारावर बंधनकारक असेल. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

१५. कंत्राटदाराकडून नेमणूक करण्यात येणाऱ्या फायर मार्शलची एक शिफ्ट ९ तासांची असेल.

१६. कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. फायर मार्शलसाठी लावणेत येणाऱ्या कामगारांकरीता कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील १९२३ तरतूदीचे, तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडन्ट फंड अॅक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन अॅक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतच्या सर्व कायदेशीर तरतूदींचे पालन करणे याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. उक्त सर्व कायद्यातील तरतूदींचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

१७. कंत्राटदारामार्फत नेमणूक करण्यात आलेले फायर मार्शल, ते कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदार संबंधितांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

१८. कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई घेतली जाईल. कर्मचाऱ्यांकडून कोंणत्याही प्रकारचे गैरवर्तन किंवा सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर स्वरूपाची चूक झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

१९. कार्यादेश प्राप्त झाल्यावर या कामासाठी नेमणूक करण्यात येणाऱ्या फायर मार्शल कर्मचाऱ्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घेणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील. किमान ८ दिवस अगोदर पोलीस व्हेरिफिकेशन केल्याचे प्रमाणपत्र न्यासास सादर करणे आवश्यक राहील. त्याच आधारावर फायर मार्शल कर्मचाऱ्यांना तात्पुरते ओळखपत्र देण्यात येईल.

२०. कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील.

२१. काम सुरू असताना निष्काळजीपणामुळे कोणत्याही प्रकारच्या मालमत्तचे नुकसान झाल्यास, नुकसान भरपाईची रक्कम न्यासामार्फत आपल्या बिलातून वजा करण्यात येईल.

२२. दरपत्रक भरतांना मूळ दरामध्ये वाहतूक, मजूरी, हमाली व इतर सर्व प्रकारचे खर्च पकडून (GST वगळून/Excluding GST) दराची रक्कम भरावी.

२३. कार्यादेशाप्रमाणे काम करीत असलेल्या कामाचे केव्हाही परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

२४. बिलामध्ये मूळ दर व अतिरिक्त कर दराचा उल्लेख करावा. प्रचलित अधिनियम/नियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कर कपात केली जाईल.

२५. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२६. काम पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कामासंदर्भात कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२७. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या कामामध्ये ५% ते १०% काम कमी जास्त प्रमाणात कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील.

२८. दरपत्रकातील नमूद बीड ऑफ कोटेशन (BOQ) व्यतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्यास अशा स्वरूपाचे अतिरिक्त काम कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावे.

२९. ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

३०. दरपत्रकात नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम न देता सदरील काम स्वत: करणे बंधनकारक राहील. उप कंत्राटदारास काम दिल्याचे निदर्शनास आल्यास बिलातून २५% रक्कम वजा करण्यात येईल. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

३१. कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

३२. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

३३. दरपत्रक सूचना अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्याचा किंवा आवश्यक बदलासह फेर दरपत्रके मागविण्याचा पूर्णत: अधिकार न्यास समितीस राहील.

३४. दरपत्रकामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून दरपत्रक सादर करावे. दरपत्रकासंबंधी काही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

अ. **श्रीमती. राखी चव्हाण, कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९७०२५४८२०४**

ब. **श्री. शाम वाघ, प्रभारी उप कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९८२१८६६२०५**

क. **श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – मोबाईल क्रमांक. ९८६७७२०१११**

ड. **श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालय**

**दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११, ०२२–६२४९१११२**

(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


## दरपत्रकधारकाबाबतची माहिती

दरपत्रकधारक / फर्मचे नांव:—————————————————

पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता:—————————————————

—————————————————

दुरध्वनी क्र. (कार्यालय):————————— (निवास):—————————

ई–मेल:—————————————————

संपर्कासाठी प्रतिनिधीचे नाव:—————————————————

संपर्कासाठी प्रतिनिधीचा मो. क्र:—————————————————

पॅन कार्ड क्र:—————————————————

बॅंकेचे नांव :————————— बॅंक खाते क्र:—————————

आय एफ एस सी कोड:—————————

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८**

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# दरपत्रकधारकाने तांत्रिक व मूल्य लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे

अ) तांत्रिक लिफाफा

०१. कंपनी नोंदणी दाखला **(महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट)** किमान ३ वर्षापूर्वीचा व्यवसाय असावा.

०२. आयकर नोंदणी पॅन कार्ड

०३. जी. एस. टी. नोंदणी दाखला

०४. मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (आय. टी. आर. रिटर्नस)
(आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५)

०५. दरपत्रकधारकाबाबतची माहिती **(पान क्र. ६ वरील माहिती भरावी)**

०६. अनुभवाचा दाखला **(अटी व शर्तीतील अट क्र. १० व ११ नुसार)**

ब) मूल्य लिफाफा

०१. मूल्य दर **(पान क्र. ८ वरील दरपत्रक भरावे)**

टिप – दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे आवश्यक आहे. अन्यथा दरपत्रके उघडण्याच्या बैठकीस उपस्थित राहता येणार नाही याची नोंद घ्यावी.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# मूल्य दरपत्रक

| दि. २९ सप्टेंबर, २०२६ (अंगारक संकष्ट चतुर्थी) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशील | एकूण संख्या | दर रु. प्रति नग/व्यक्ती | एकूण रक्कम रु. (जीएसटी वगळून) |
| १ | ABC type portable fire extinguisher cap 6kg ISI mark | ७५ | | |
| २ | Fire Buckets | २० | | |
| ३ | Fire Marshal (3 Shift) | १५ | | |
| अनु क्र. १ + अनु क्र. २ + अनु क्र. ३ मिळून एकूण रक्कम रुपये | | | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का